REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# द. ता. भोसले यांची आस्वादक समीक्षा


डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक , मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

## १) शब्दप्रदेशाची पाऊलवाट

गेल्या दोन दशकांपासून मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याची निर्मिती विपुल प्रमाणात होत आहे. अनुभवाच्या दृष्टीने सशक्त असणारी ही ग्रामीण साहित्याची सर्वच अंगांनी बहरत चालले आहे. त्या मानाने ग्रामीण साहित्य समीक्षा करणारे ग्रंथ तुलनेने खूप कमी आहेत. मराठी साहित्याची आवड वाढीस लागण्यासाठी आणि नव्या पिढीमध्ये वाचनसंस्कृतीचे संवर्धन होण्यासाठी, साहित्यकृतीचा सर्वांगीण आणि आस्वादक असा परिचय करून देण्यासाठी समीक्षेची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. मुळातच साहित्याची ओळख करून देणारी, तिचे सत्व आणि सामर्थ्य सांगणारी समीक्षा सहजपणे समजणारी नसते. त्यामुळे वाचक तिच्याकडे पाठ फिरवतो. म्हणून १९८० नंतरच्या ग्रामीण साहित्याची रसिकतेने ओळख करून देण्याची भूमिका आजच्या काळात खूप गरजेची झालेली आहे. अशा आस्वादक समीक्षेतूनच साहित्याचे सत्त्व, सामर्थ्य आणि सौंदर्य जाणून घेणाऱ्या रसिकाची संख्या वाढीस मदत होईल. या सर्व पार्श्वभूमीवर प्रा. डॉ. द. ता. भोसले यांच्या 'शब्दप्रदेशाची पाऊलवाट' या ग्रंथाचे निर्मितीमूल्य खूप महत्त्वाचे आहे.

एकूण नऊ लेख या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहेत. हे नऊ लेख म्हणजे साहित्यग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना आहेत. 'माणदेशचा फेरफटका'-डॉ. कृष्णा इंगोले, 'ललितगद्याची आनंदयात्रा'-डॉ. बाळासाहेब गुंजाळ, 'जीवनवादी समीक्षेची भूमी'-डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'तिफणसाजचे भावलावण्य'-इंद्रजित भालेराव, 'काळ्या आईच्या लेकराची कहाणी'-डॉ. गजानन जाधव, 'प्रकाशवाटेवरून जाताना'-प्रकाश काळे, 'एका भूमिकन्येची गगनभरारी'-जोतीराम फडतरे, 'ग्रामजीवनातील काळोख आणि धुरळा'-प्रा. अर्जुन व्हटकर, 'एका गांधीभक्ताचे दर्शन'-सदाशिव रामचंद्र मोरे; अशा लेखकांच्या ग्रंथांना लिहिलेल्या या प्रस्तावना आहेत.

प्रस्तावना म्हणजे ग्रंथाची तोंडओळख असते; पण केवळ तोंडओळख करून न देता, त्या ग्रंथाचा वरवरचा परिचय करून न देता त्या ग्रंथकाराच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू प्रा. भोसले यांनी सांगितले आहेत. शिवाय त्या ग्रंथाची जाणवलेली वैशिष्ट्ये सांगत असतानाच त्या वैशिष्ट्यांचे व्यापक पातळीवर महत्त्वही सांगितले आहे. हे सर्व प्रा. भोसले यांनी अभिरूचिसंपन्न व लालित्यपूर्ण शैलीत सांगितल्यामुळे त्या ग्रंथकाराचे व्यक्तिमत्त्व व त्या ग्रंथाची वैशिष्ट्ये त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेतून वाचकासमोर उभी राहतात.



या ग्रंथातला 'माणदेशाचा फेरफटका' हा समीक्षालेख अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. या लेखात लेखाचा आत्मशोध कसा आहे, हे सांगत असतानाच प्रा. भोसले लेखकाची माणदेशावर असणारी श्रद्धा अधोरेखित करतात. समतोल वृत्तीने आणि संशोधक भूमिकेने लेखकाने माणदेशाचे कसे अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे, त्याविषयी भोसले म्हणतात, लेखकाने या ग्रंथात केवळ भौगोलिक परिचय करून दिला नाही तर इथले

हवामान, पाऊसपाणी, इथला प्राचीन इतिहास, मंदिरे, प्राचीन काळातील राजवटी; सामाजिक, राजकीय आंदोलने, सन १९४२ चा स्वातंत्र्य लढा, या भागात होऊन गेलेले साधुसंत, इथल्या लोककला, इथली उपास्य देवता, इथला व्यापार, अर्थव्यवस्था, कारखानदारी आणि आजघडीला या भूप्रदेशाला भेडसावणारे ज्वलंत प्रश्न आणि त्यावरचे उपाय या सर्वांचे त्यांनी अभ्यासपूर्ण, समतोल वृत्तीने आणि संशोधक भूमिकेने विवेचन केले आहे. अशी ग्रंथाची तोंडओळख करून देत असतानाच समाजाची गरज ओळखून आपल्याकडे वैचारिक, सामाजिक विषयावरील तसेच संशोधनपर स्वरूपाचे लेखन फारसे होत नाही, याबद्दल प्रा. भोसले खंत व्यक्त करतात. 'ललित गद्याची आनंदयात्रा' या लेखात इतर गद्यलेखनापेक्षा कवीचे गद्यलेखन वैशिष्ट्यपूर्ण कसे असते, याविषयी प्रा. भोसले सांगतात, ''कवी असल्याने त्यांच्या गद्यलेखनाला लालित्य आणि काव्यात्मता यांचा मुलामा स्पर्श झालेला असतो. अशा गद्यातून त्यांचा व्यासंग लक्षात येतो. दृष्टी लक्षात येते. प्रगत आणि उन्नत अशी अभिरूची आपल्या लक्षात येते. त्यांनी लिहिलेल्या कवितांतून या साऱ्या गोष्टींचे पुरेसे दर्शन सहसा घडत नाही. फार तर अंशयमय दर्शन घडले तर घडत असावे. त्यामुळे अशा कविवर्यांनी केलेल्या गद्यलेखनाला अधिक सौंदर्य लाभलेले असावे.''

कवी वसंत बापटांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू लेखकाने उलगडून दाखिवले आहेत. जीवनावर उत्त्कट प्रेम करणारे, दो दो हातांनी जीवनातील आनंदाचे अमृतपान करणारे, मुक्त आणि तृप्त करणारे, जीवनाची यात्रा करण्यात जीवनाचे सार्थक मानणारे आणि दु:खाच्या तप्त निखाऱ्यावरून चालतानाही ओंजळीतल्या चार फुलांवर हसतमुखाने फुंकर घालणारे हे एक रंग, गंध, नाद आणि स्वाद यांनी चिंब झालेले व्यक्तिमत्त्व आहे.

बाबासाहेब गुंजाळ यांनी कवी वसंत बापटाच्या व्यक्तिमत्वाची ओळख अशी करून दिली आहे. याविषयी प्रा. भोसले म्हणतात, ''एका आनंदयात्रीच्या गद्याची ओळख दुसऱ्या आनंदयात्री समीक्षकाने रसडोळस भूमिकेने घडविली असल्याने समीक्षाग्रंथ बापटांची गद्यलेखक म्हणून सशक्त नि स्पष्ट प्रतिमा निर्माण करण्यात यशस्वी झाला आहे. बापटांच्या व्यक्तिमत्त्वाइतकी उंची आणि बापटांच्या संवेदनशील ते इतकी उंची प्रा. बाळासाहेब गुंजाळ यांनी या ग्रंथात गाठलेली असल्यामुळेच या ग्रंथाला परिपूर्णता प्राप्त झालेली आहे.'' जीवनवादी समीक्षेची भूमी' या समीक्षात्मक लेखात मार्क्स, आगरकर, शाहू, फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक योगदानावर डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची समीक्षादृष्टी विकसित झाली आहे, असे भोसले सांगतात. 'ग्रामजीवनातील काळोख आणि धुरळा' या समीक्षात्मक लेखात प्रा. अर्जुन व्हटकर याच्या कथेची वैशिष्ट्ये प्रा. भोसले यांनी सांगितली आहेत. १९८० नंतरचे ग्रामीण जीवनातील बदल व त्या बदलांनी निर्माण झालेले नवीन प्रश्न व्हटकरांची कथा अधोरेखित करते. परंपरेला घट्ट धरून बसणारे लोकमानस, त्यातून होणारा नव्या–जुन्याचा संघर्ष आणि भरीस भर घालणारी जातीय भावना या सर्वांचा झालेला परिपाक म्हणजे दु:खाचा हलकासा पदर पांघरून अवतरलेली प्रा. व्हटकराची कथा हो, हे ते सहजपणे सांगतात. 'तिफणसाजचे भावलावण्य' या लेखात इंद्रजित भालेराव यांच्या ग्रंथांची प्रा.भोसले यांनी बलस्थाने सांगितली आहेत. हे सांगत असतानाच लेखकाची शेती आणि शेतकऱ्यांविषयी नेमकी धारणा काय आहे, याविषयी ते म्हणतात, ''गायकाचा सूर, कलावंताचा शब्द, आणि शेतकऱ्यांचा नांगर या तीन गोष्टी म्हणजे समाजजीवन उन्नत नि समृद्ध करणारा सर्जनोत्सव असतो अशी या लेखकाची धारणा जाणवते.'' लेखकाची शेतीविषयक असणारी धारणा, आंतरिक तळमळ, त्या लेखनामागची आत्मीयता ऐवढेच सांगून भोसले थांबत नाहीत, तर एकूणच त्या ग्रंथाचा धांडोळा घेतात. 'तिफणसाज' या लेखातून ग्रामीण समाज आणि संस्कृतीचे जसे दर्शन घडते, तसेच प्रा. भालेराव यांच्या व्यक्तिमत्त्वाचेही लोभस दर्शन इथे घडते. बहुविध स्वरूपाचा व्यासंग, निकोप रसिकता, ग्रामीण वास्तवाचे सूक्ष्म अवलोकन, शेती आणि शेतकरी जीवनाविषयी असणारी आस्था लोकसाहित्यापासून ते स. ना. जोशींसारख्या नवोदितांपर्यंतच्या साहित्याचे रसडोळस वाचन, चिंतन, विषयाला पोषक असणारे संदर्भ देण्याची हातोटी आणि वाचकांशी संवाद साधण्यातला मनाचा मोकळेपणा असे अनेक 'व्यक्तिमत्त्वविशेष' या लेखातून उत्तम प्रकारे प्रकट झाले आहेत. इंद्रजित भालेराव यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू व त्यांच्या ग्रंथाची वैशिष्ट्ये सहज आणि साध्यासोप्या भाषेत सांगितल्यामुळे वाचकाला मूळ ग्रंथाची ओळख होण्यास मदत होते. 'काळ्या आईची लेकराची कहाणी, 'प्रकाशवाटेवरून जाताना', 'एक भूमिकन्येची गगनभरारी', ' एका गांधीभक्ताचे दर्शन' हे सर्वच लेख लक्षणीय असे आहेत. प्रत्येक समीक्षात्मक लेखातून त्या ग्रंथाची वैशिष्ट्ये व त्या ग्रंथातील विषयाच्या अनुषंगाने आजच्या वर्तमानावर, सामाजिक स्थितीगतीवर व

आजच्या साहित्यावर प्रा. भोसले यांनी विवेचन केले आहे. त्यांचे हे विवेचन नव्या संशोधकांना, अभ्यासकांना उपयोगी पडणार आहे.

सकस साहित्याची निर्मिती होत असताना वाचन संस्कृती नानाविध कारणांनी कमी होत चालली आहे. मराठी भाषेची आवड निर्माण होण्यासाठी, वृद्धिंगत होण्यासाठी समीक्षेची भूमिका महत्त्वाची असते. पाश्चात्य विचाराने, कधी वादाने तर कधी एखादा प्रवाह, लेखक मानून साहित्याची समीक्षा केली जाते; पण मराठी भाषेची आवड निर्माण होण्यासाठी, मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी आस्वादक समीक्षेची आज खऱ्या अर्थाने गरज आहे आणि ती गरज ओळखूनच द. ता. भोसले यांनी 'शब्दप्रदेशाची पाऊलवाट' या ग्रंथाचे लेखन केले असावे, असे वाटते.

## २) ग्रामीण बोलीचा शब्दकोश

माणसाची खरी ओळख त्याच्या बोलीभाषेतून होते. बोलीभाषेतूनच त्याचा व्यवसाय, जात, प्रांत, देश या सर्व घटकांची ओळख होते. अशी 'बोली' बोलणारा समूह मोठा असतो. तो निसर्गाशी निगडित असतो. तो आपल्या बोलीतूनच त्याचा जीवन व्यवहार पार पाडीत असतो. अशा बोलीला समृद्ध परंपरा असते. प्राकृत, अपभ्रंशी, मागधी, अर्धमागधी अशी महाराष्ट्राची परंपरा आहे. समाज प्रबोधनासाठी संत ज्ञानेश्वर, संत तुकरामांनी बोलीभाषेचा वापर केला. संतांनी मराठी बोलीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सृजनाच्या अत्युच्च पातळीवर तिला नेले. महानुभाव पंथाने तिचे सौंदर्य जगासमोर आणले. लावणी, पोवाडे, लोकनाट्य हे सर्व बोलीभाषेतूनच लोकांसमोर आले. लोकजीवन समृद्ध करणाऱ्या बोलीभाषा हळूहळू नष्ट होऊ पाहात आहेत. जागतिकीकरणाने ही प्रक्रिया आणखी गतिमान झाली आहे. जागतिकीकरणाने माणसाचे जगण्याचे संदर्भ जसे बदलले; तसे भाषेचेही बदलले. आज मोठ्या प्रमाणात इंग्रजी भाषेचा प्रभाव मराठी भाषेवर पडत आहे. खेडोपाडी आज इंग्रजी शाळांचे पेव फुटले आहे. आज खेड्यातही इंग्रजीविषयी कमालीचे आकर्षण, वाढू लागले आहे. या जागतिकीकरणाच्या रेट्यात मराठी भाषेचे भवितव्य काय? मराठी भाषा जगणार की मरणार? असा वाद-विवाद होत आहे. कधी नाही एवढी मराठी भाषेच्या भवितव्याची चर्चा होत आहे. याच काळात डॉ. द. ता. भोसले यांचा ग्रामीण बोलीचा शब्दकोश हा ग्रंथ, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई यांच्याकडून प्रसिद्ध झाला आहे. आत्तापर्यंत मराठी भाषेचे अनेक शब्दकोश प्रसिद्ध झाले आहेत. पण शब्दाच्या मुळाशी असणारा अर्थ, त्याची उत्त्पत्ती, तो शब्द कोणत्या भाषेमधून मराठीत आला, त्याचा इतिहास काय आहे? सध्या तो व्यवहारात कोणत्या रूपाने वापरला जातो? या शब्दामागे समाजमनाची धारणा काय आहे? अशा अनेक अंगांनी लेखकाने शब्दांकडे पाहिले आहे. हे या ग्रंथाचे वेगळेपण आहे. शब्दकोशनिर्मिती करणे म्हणजे अपार मेहनत. अभ्यासात सातत्य, चिंतन व भाषेविषयी जातिवंत कळवळा असल्याशिवाय अशा ग्रंथाची निर्मित्ती होत नाही. लेखकाचे भाषेविषयीचे चिंतन त्यांच्या मनोगतात पाहावयास मिळते.

भाषा सशक्त, समर्थ व्हायची असेल तर सर्वांकडून सातत्याने, जाणीवपूर्वक वापरली गेली पाहिजे. ज्ञानभाषा म्हणून तिचा उपयोग समाजाला करता आला पाहिजे. त्यासाठी शब्दभांडाराची विपुलता हवी. शिवाय भाषेत लवचिकता असायला हवी. बोलणाऱ्याकडे भाषेविषयीची अस्मिता आणि आत्मियता असायला हवी. जाणीवपूर्वक व सातत्याने साहित्याची निर्मिती व्हायला हवी. परकीय भाषेतील उत्तम अशा ग्रंथांचा अनुवाद व्हायला हवा. नवीन तंत्रज्ञानाचा भाषाविकासासाठी उपयोग व्हायला हवा. लेखकाच्या या चिंतनातून भाषेविषयी कळवळा व्यक्त होतो. ग्रामीण बोलीतील अनेक शब्द कमालीचे अर्थवाही, रसरशीत, अचूक अर्थच्छटा व्यक्त करणारे आणि खास अंगभूत सामर्थ्य प्राप्त झालेले असूनही ते झपाट्याने लोप पावत आहेत. मराठी भाषेविषयीची ही खंत लेखकाने व्यक्त केली आहे. बोलीतील अनेक शब्द तरूण पिढीला माहीत नाहीत. बोलीतील हे शब्द 'मातीत गाडल्या गेलेल्या सुवर्णमुद्राच' आहेत. त्यांचा वापर होणे गरजेचे आहे. या भूमिकेतूनच लेखकाने या ग्रंथाची निर्मिती केली आहे. त्यासाठी लोप पावत चाललेल्या अनेक शब्दांचा त्यांनी परिचय करून दिला आहे. 'किडूक-मिडूक' हा शब्द पूर्वी खेड्यात सहज बोलला जात असे. संसारात काटकसर करून पैसा, सोन्याचे दागिने, घागर, तांब्या अशा मौलिक वस्तू जपून ठेवल्या जात असत; परंतु कुटुंबावर संकट आल्यास ह्या सर्व वस्तू विकाव्या लागत. याचवेळी घरातील ''किडूक-मिडूक'' विकले, असे तो सांगतो. व्यवहारात हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला जात असे; हे सांगत असताना तो शब्द कसा तयार झाला; याविषयी इतर भाषाभ्यासकांची मतेही लेखक नोंदवितात. 'कुटिक' म्हणजे सोन्याचा दागिना यापासून हा शब्द तयार झाला आहे. तर अन्य काही अभ्यासकांना हा शब्द कानडीतल्या 'कुडूक' पासून निर्माण

झाला असावा, असे वाटते. 'कुडूक' शब्दाचा अर्थ दागिना असाच आहे. अर्थाला वजन प्राप्त होण्यासाठी. त्याचा परिणाम वाढविण्यासाठी समाहार द्वंद्व साधणारा 'मिडूक' शब्द त्याला लावण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्थाला खरोखरच परिणामकारकता लाभली आहे. अशा एका शब्दाची ओळख करून देताना, त्या शब्दाच्या विविध अर्थच्छटा, त्या शब्दाची लय, काव्यात्मकता व शब्द वापरण्यामागची धारणा लेखकाने सांगितली आहे. बोली ही मर्यादित क्षेत्रात बोलली जाते. ह्या बोलीभाषेतील प्रामुख्याने खेड्यात बोलल्या जाणाऱ्या एक़ा शब्दावरून ग्रामीण संस्कृती वाचकांच्या डोळ्यांसमोर उभी राहते. दैन्य, दारिद्र्य, भूक, उपासमार असलेले असे खेडे वाचकांच्या डोळ्यासमोर उभे राहते. भाषा कोणतीही असो; ती एकटी येत नाही. ती आपली प्रादेशिक संस्कृती बरोबर घेऊन येते. 'जावळ' हा असाच खूप कौतुकाने उच्चारला जाणारा शब्द. जावळ काढण्याचा विधी लांबत गेला, तर त्या जावळाची आईला वेणी घालावी लागे अशा जावळाचे आईला खप कौतुक असे. जावळाविषयीची आपली भावना ती ओवीतून व्यक्त करते. 'मोटारीपरास जाती सायकली तोऱ्यानी।

माझ्या बाळाचं जावाळ उडे बाई वाऱ्यानी।

मध्वमुनी या संत कवीनेही आईचे वात्सल्य व्यक्त केले आहे. ते असे,

''लेकुरवाळी ओवाळिते।
जावळासी कुरवाळिते।।''

जावळ काढण्याच्या विधीची लेखकाने माहिती सांगितली आहे. मामाच्या मांडीवर मुलाला बसवले जाई. केसांची पहिली बट मामाच कापतो; आणि मग उरलेले केस न्हावी कापतो. मामाला नव्या कापडाचा आहेर केला जातो. न्हाव्यालाही कपडें, मोबदला दिला जातो. 'जावळ' या एका शब्दावरून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकजीवनामध्ये जावळ काढण्याच्या विधिला किती अनन्यसाधारण महत्त्व होते, तेही समजते. बांधाटी, बारगीट, ताईत, तळखडा, तलफ, तलंग, तराळ, पाठराखण, पिकदाणी अशा अनेक महत्त्वाच्या शब्दांची लेखकाने ओळख करून दिली आहे. हे करीत असताना लेखकाने संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ अशा संतांच्या काव्याचे संदर्भ दिले. थोडक्यात, मराठी भाषेच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरावा असा हा ग्रंथ आहे.

## संदर्भः–

1. ग्रामीण साहित्य एक चिंतन द. ता. भोसले मेहता प्रकाशन पुणे.
2. लोकोत्तर गाडगेबाबा जीवन आणि कार्य ग्रंथाली प्रकाशन मुंबई.